# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/11/2023 (मंगळवार) दुपार

---

### जबरी चोरी करणारे आरोपी गजाआड पोलीस स्टेशन कळमेश्वरची कार्यवाही

पोस्टे कळमेश्वर हद्दीत १५ किमी अंतरावर कोहळी मोहळी शिवार कळमेश्वर येथे दिनांक १२/११/२०२३ चे रात्री ०२.०० वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी गोपीचन्द्र बनवारीलाल गौतम व त्याचे मित्र हे रूममध्ये हजर असता यातील अनोळखी आरोपीतांनी फिर्यादी व त्याच्या साथीदाराला रुम मध्ये बंद करुन त्यांना टिकास व सब्बलचा धाक धाकवुन रेल्वेचा स्क्रॉप माल तसेच फिर्यादी व त्याचे साथीदाराचे ०७ अँन्डरॉइड मोबाईल फोन किंमती अंदाजे ४९०००/— रुपये असा एकुण १,०४,०००/— रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेल्याचे फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे ०४ अनोळखी आरोपींविरुध्द अप क्र. ९७५/२३ कलम ३९२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील तपास पथक करीत असता घटनास्थळावरून खापरी येथील केने येथील ग्रामपंचायत सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता सदरचे वाहने हे कळमेश्वरकडे बायपास रोडनी जातांनी दिसुन आल्याने सेलु टोल नाका येथील पुन्हा सीसीटीव्ही फुटेज चेक करून पाहीले असता आरोपींतांनी गुन्हयात वापरलेले वाहन हे दिसुन आले. सदर टाटा योद्धा पिकअप वाहन एम. एच—३७/टी—२०७३ ही खरी नंबर प्लेट काढून सदर गाडीचा नंबर एम. एच—३७/टी—६५६९ ही बनावटी नंबर प्लेट तयार करून प्लेटची वाहन ॲपवर माहिती काढली असता ते वाहन मोपेड वाहनाचे दाखविल्यावरून सदर वाहनास लागलेल्या फास्ट टॅगची माहिती काढली असता ते वाहन कारंजा वाशिम येथे दाखवत असल्याने तपास पथक हे कारंजा वाशिम येथे रवाना होंवुन मुळ मालकास विचारपुस करून त्यांनी सांगतिले की, मी सदरचे वाहन हे चंद्रपूर येथील मो. फिरोज अब्दुल वाहग यास विकल्याचे सांगतिल्यावरून सदर पत्त्यावर तपास पथक हे रवाना होवुन शोध घेतला असता मो. मो. फिरोज अब्दुल वाहग हा मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन गुन्हयाच्या अनुशंगाने सखोल विचारपुस केली असता त्याचे सोबत **आरोपी क्र. १) संतोष राजकुमार राय, वय १९ रा. घुग्गुस जि. चंद्रपूर २) करण अर्जुन नाईक, वय २३ रा. घुग्गुस जि. चंद्रपूर** यांना ताब्यात घेवुन तसेच गुन्हयात वापरलेले वाहन एम. एच—३७/टी—२०७३ किंमती अंदाजे ५,५०,०००/—रू डीटेन करून पोस्टेला हजर येवुन नमुद आरोपीतास गुन्हयाच्या अनुंशगाने विचारपुस करणे सुरू आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पोटभरे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार साहेब (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर, श्री. अजय चांदखेडे, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार श्री. यशवंत सोलसे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. दिलीप पोटभरे, सहायक फौजदार श्री. मन्नान नौरंगाबादे, पोलीस हवालदार श्री. पंकज गाडगे, संजय वानखेडे, पोलीस अंमलदार श्री. राणा ठाकूर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर